(33)

(1)

**महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.**

सिडको भवन (दक्षिण कक्ष) 1ला मजला, बेलापूर, नवी मुंबई.400 614.

मुख्य प्रशासकीय अधिकारी/आस्था.5

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 62 वी सभा दिनांक 30.3.1994 रोजी मंत्रालय, मुंबई येथील मा.नगर विकास मंत्री व मंडळाचे अध्यक्ष यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीतील वरील इतिवृत्ताचा मसूदा मान्यतेसाठी सादर केला आहे.

(र.शं.पिसे)
आस्थापना अधिकारी

मुख्य प्रशासकीय अधिकारी,

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, 9/5/94

सदस्य सचिव, 16/5/94.

मा.मंत्री (नगर विकास) व
मंडळाचे अध्यक्ष 25/5

दिनांक 30.3.1994 (बुधवार) रोजी झालेल्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 62 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 62 वी सभा बुधवार, दिनांक 30.3.1994 रोजी मा. मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष मा.ना.श्री.अरुणलाल गुजराथी यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्याच दालनात मंत्रालय येथे सकाळी 9 वाजता संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1) मा.श्री.अरुणलाल गुजराथी — अध्यक्ष
मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष.

2) मा.श्री. अशोकराव चव्हाण — विशेष निमंत्रीत
राज्यमंत्री, नगर विकास.

3) श्री.डी.टी.जोसेफ, — सदस्य
सचिव (४),
नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई 32.

4) श्री.सुरेश कुमार, — सदस्य
सचिव,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

5) श्री.श्री.बं.गांगुर्डे — सदस्य
उप सचिव (खर्च)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

6) श्री.प्रभाकर मणचेकर, — सदस्य
आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

7) श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील, — सदस्य
सदस्य,
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर.

8) श्री.गणेश रॉय — सदस्य

9) श्री.एम.आर.अगरवाल — सदस्य

10) श्री.एम.के.गोखले — सदस्य

11) श्री.शे.दौ.अरमाळ — सदस्य सचिव.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे उपाध्यक्ष व राज्यमंत्री ग्राम विकास श्री.माणिकराव ठाकरे व भारत सरकारचे सल्लागार,मध्यवर्ती सार्वजनिक आरोग्य स्वच्छता संस्था,नगर विकास,मंत्रालय,नवी दिल्ली हे मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांची रजा मंजूर करणेत आली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1) श्री.अे.अे.संकपाळ,मुख्य अभियंता (ग्रामीण)
2) श्री.के.आर.मठकर, मुख्य अभियंता (नागरी)
3) श्री.र.शं.पिसे, मुख्य प्रशासकीय अधिकारी,
4) श्री.एम.आर.कुलकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री, नगर विकास यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि नंतर विषयवार चर्चेला सुरूवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.1:-** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 61 व्या सभेच्या प्रारूप इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या दिनांक 20.10.93 रोजी झालेल्या 61 व्या सभेचे इतिवृत्त मंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आले होते. या इतिवृत्तात कोणीही सूचना व दुरुस्ती सुचविली नाही असे सदस्य सचिवांनी निदर्शनास आणले तेंव्हा सदर इतिवृत्तास दुजोरा देण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.2:-** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या दि.20.10.93 रोजी झालेल्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 61 व्या बैठकीतील निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा खुलासा सदस्य सचिवांनी केला. सर्व सदस्यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली. या बाबींवर चर्चा चालू असतांना कार्यक्रम बाब क्र.5 वरील कार्यवाही बाबत सविस्तर माहिती सदस्य सचिवांनी दिली. ही माहिती देत असतांना मोरबे धरणाचे काम सिडको घेण्यास तयार आहे व ते काम मंडळाकडून करून घेण्यास तयारी देखील सिडकोने दर्शविली आहे. तथापि मंडळाकडून आकारले जाणारे 17.5 टक्के ई.टी.पी.चार्जेस हे जास्त वाटतात व त्याचा पुर्नविचार व्हावा अशी सिडको यांनी विनंती केली आहे. 17.5 टक्के ऐवजी 14 टक्के ई.टी.पी.चार्जेस लावल्यास ते काम सिडको मंडळाकडून करून घेईल असे सांगण्यांत आले. याबाबत सर्वश्री.गोखले आणि अगरवाल, सदस्य यांनी असे प्रतिपादन केले की या कामासाठी 17.5 टक्के ई.टी.पी.चार्जेस कमी केल्यास ती पध्दत पडेल व इतर संस्था देखील अशा प्रकारची मागणी मंडळाकडे करतील म्हणून ई.टी.पी.चार्जेस कमी करण्याची विनंती मान्य करण्यांत येवू नये. यावर सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की,मोरबे धरण हा मोठा प्रकल्प असल्याने सिडकोने विनंती केल्या प्रमाणे 14 टक्के ई.टी.पी.चार्जेस लावून देखील ते काम मंडळास परवडेल.कारण या प्रकल्पासाठी मनुष्यबळ अथवा जी यंत्रणा मंडळाने नेमली आहे त्याचा खर्च 14 टक्के इतका कमी आहे. तेंव्हा सिडकोची विनंती मान्य करण्यास हरकत नसावी.

---

यावर चर्चा करताना मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, केवळ विशिष्ट कामाबाबत ई.टी.पी. कमी करणे योग्य होणार नाही. सर्वश्री गोखले व अगरवाल सदस्य यांनी असे प्रतिपादन केले की ई.टी.पी. चार्जेस कमी केल्यास इतरहि संस्था देखील अशा प्रकारची मागणी मंडळापुढे करतील. म्हणून सरसकट ई.टी.पी. चार्जेस कमी करण्यात येऊ नये. यावर मा. अध्यक्ष यांनी असे सुचविले की पूर्ण ठेव कामासाठी ई.टी.पी. चार्जेस लावण्याबद्दल एक विशिष्ट धोरण ठरवावे. उदाहरणार्थ रु. १० कोटी, २५ कोटी आणि रु. ५० कोटी व त्यापेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी वेगवेगळे ई.टी.पी. चार्जेस लावणे शक्य होईल किंवा ते योग्य होईल का हे लक्षात घेऊन मंडळाला तो प्रस्ताव सादर करावा. तसेच ई.टी.पी. चार्जेसचा प्रश्न तूर्तास बाजूला ठेवून इतर कार्यवाही चालू ठेवावी.

मा. अर्थमंत्र्यांशी चर्चा करण्यात यावी.

कार्यक्रम बाब क्र. 16 व 17 वरील कार्यवाहीवर चर्चा करतांना मा. अध्यक्षांनी मंडळाचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक प्रशासन अहवाल फार उशिरा विधान मंडळास सादर केले जातात याबददल नाराजी व्यक्त केली. 1992-93 व 93-94 चे अहवाल पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्याच्या सुचना दिल्या.

अध्यक्षांनी असेही सुचविले की, यापुढे मंडळाच्या बैठकींना सचिव पाटबंधारे विभाग यांना विशेष निमंत्रीत म्हणून बोलाविण्यात यावे.

बाब क्र. ३ – सुधारीत अंदाजपत्रक ९३-९४.

या बाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळ कायदा १९७६ चे कलम नं. २७ मध्ये मंडळाचा कारभार शक्यतो नुकसानित चालू नये असे सांगितले आहे. दि. १.४.९३ पासून ई.टी.पी. चार्जेस वाढविले नाही तर मंडळाच्या वार्षिक लेख्यामध्ये सुमारे रु. २२४.०८ लाख एवढी तूट दाखवावी लागेल. ही तूट दाखविल्यामुळे महालेखाकारांचा आक्षेप येण्याची शक्यता आहे. यावर अध्यक्ष यांनी असे सूचविले की, निदान सध्या तरी ई.टी.पी. चार्जेस वाढविणे शक्य नाही. १९९३-९४ च्या वार्षिक लेख्यामध्ये तोटा येत असेल तर तो दाखवावा. यर्वेनंतर १९९३-९४ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले व खालील ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव:-असा ठराव करण्यात येतो की, 1993-94 वर्षासाठी खालील प्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

| | अंदाजपत्रकीय तरतुद 1993-94 | सुधारीत अंदाजपत्रकीय व तरतुद 1993-94 |
|---|---|---|
| 1) महसुली उत्पन्न | 14,938.00 | 14,448.79 |
| 2) महसुली खर्च | 14,805.00 | 14,672.87 |
| 3) भांडवली मिळकत | 27,791.45 | 18,512.23 |
| 4) भांडवली खर्च | 26,816.00 | 18,186.00 |

**कार्यक्रम बाब क्र. 4 :-** अंदाजपत्रक 1994-95

सदर बाब मांडतांना सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की, मंडळाचे अंदाजपत्रक तयार करतांना ई.टी.पी. चार्जेस 17.5 टक्क्या ऐवजी 21 टक्के दराने तयार केलेले आहे. ई.टी.पी. चार्जेस 17.5 टक्यावरुन 21 टक्के वाढविण्याचा प्रस्ताव देखील या सभेसमोर ठेवलेला असून तो मंजुर होईल असे गृहित धरुन ई.टी.पी. चार्जेस 21 टक्के धरलेला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ई.टी.पी. चार्जेस 17.5 टक्के वरून 21 टक्के वाढविण्याचे कारण सांगतांना सदस्य सचिवांनी असे सांगितले की, स्थानिक संस्थांकडून मंडळाला येणे असलेली रक्कम प्राप्त होत नाही. त्यामुळे मंडळाला भांडवली खर्चासाठी मिळणारा निधी पाणी पुरवठा केंद्रे चालविण्यासाठी, कर्जाची परतफेड करण्यासाठी वळविला जातो. त्यामुळे भांडवली खर्च कमी होतो. व परिणामत: मंडळाला ई.टी.पी. चार्जेस कमी मिळतात. त्यामुळे मंडळाचा दैनंदिन कारभार चालविणे देखील जिकीरीचे झाले आहे. म्हणून ई.टी.पी. चार्जेस वाढविण्याची गरज

मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, भांडवली खर्च कमी झाला म्हणून ई.टी.पी. चार्जेस कमी झाले. भांडवली खर्च जर वाढला असता तर ई.टी.पी. चार्जेस सुध्दा वाढले असते, बाब क्र. ३ मध्ये ठरल्या प्रमाणे १९९४-९५ सालातील २१ टक्के धरून अंदाजपत्रक तयार करणे योग्य नाही. या वर चर्चा होऊन असे ठरले की, १७.५ टक्के ई.टी.पी. चार्जेस धरून मंडळ या अंदाजपत्रकास मंजूरी देत आहे. अंदाजपत्रकामध्ये सांगितले प्रमाणे १७.५ टक्के धरून ई.टी.पी. चार्जेस लावल्यामुळे जी तूट रू. ५०१ लाखाची दाखविली आहे तशीच दाखवावी आणि ठरावामध्ये त्याचा अंतर्भाव करावा.

ठराव :

" असा ठराव करण्यात येतो की, सध्या प्रमाणेच १७.५ टक्के ई.टी.पी. चार्जेस गृहित धरून रू. ५०१ लाख महसूली तूट असलेले १९९४-९५ चे अंदाजपत्रक इतर कांहीहि फरक न करता मंजूर करण्यात येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.5:-** वार्षिक अहवाल सन 1991-92

सन 1991-92 या वर्षाचा अहवाल सदस्य सचिवांनी मंडळा समोर मांडला. त्यावर चर्चा चालू असतांना श्री.सुरेशकुमार, सचिव, ग्राम विकास यांनी असा मुददा उपस्थित केला की, चालु योजनांच्या प्रकल्पांचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत नाही तरी असा आढावा प्रत्येक तिमाहिस घेण्यात यावा, आणि याबाबत सद्यः स्थितीत योजनांची प्रगती न होण्याच्या कारणांसह मंडळासमोर मांडण्यात यावा. यावर मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, ग्रामीण योजनांबाबत सचिव, ग्राम विकास विभाग यांच्या स्तरावर आढावा घेण्यात यावा. व नागरी योजनांच्याबाबतीत सचिव, नगर विकास यांच्या स्तरावर आढावा घेण्यात यावा. व त्यानंतर मे, 94 मध्ये यासंबंधी एखादी खास बैठक घेऊन तो मंडळासमोर मांडावा. त्या नंतर सचिव, नगर विकास यांनी असे सुचविले की, या योजनांचा आढावा सचिव स्तरावर घेण्यापूर्वी संबंधीत अधीक्षक अभियंता यांना एक विहित तक्ता तयार करून पाठवावा व त्यामध्ये (1) 10 वर्षा पासून रेंगाळलेल्या योजना (2) 7 ते 10 वर्षापासून रेंगाळलेल्या योजना (3) 5 ते 7 वर्षापासून रेंगाळलेल्या योजना व (4) पांच ते तीन वर्ष कालावधीसाठी रेंगाळलेल्या योजना या प्रमाणे देऊन या योजना रेंगाळण्याची कारणे उदा. निधी अभावी, तांत्रिक अडचणीमुळे, भूसंपादनाचे प्रश्न व प्रलंबित प्रशासकीय मान्यता इत्यादिंचा त्यात समावेश करण्यात यावा. व ही माहिती सर्व अधीक्षक अभियंते यांच्याकडून एकत्रित करून त्या योजनांचे परिक्षण झाल्या नंतर संबंधीत सचिवांकडे पाठवावा. व त्या नंतर तो मंडळापुढे सादर करता येईल.

चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला: -

ठराव:,

"असा ठराव करण्यात येतो की, मंडळ 1991-92 या वर्षाच्या वार्षिक अहवालास मंजूरी देत असून सदस्य सचिव यांनी तो विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर सादर करण्याकरता शासनाकडे पाठविण्याचा अधिकार देण्यात येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.6:-** सन 1991-92 चा लेखा परिक्षण अहवाल.

1991-92 चा लेखा परिक्षण अहवाल सदस्य सचिवांनी मंडळा समोर मांडला. आणि त्यावर चर्चा करीत असतांना मा. सदस्य श्री. अगरवाल यांनी अशी विचारणा केली की, मंडळाच्या 47 व्या मिटींगमध्ये मंडळाकडे असलेल्या साठयाचा तपासणी आढावा चार्टर्ड अकौटंट सारख्या एजन्सीकडून तपासून घेण्या बाबत ठरले होते. त्यावर काय कार्यवाही करण्यात आली. त्यावर सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की, मंडळाकडे असलेल्या साठयाची माहिती मंडळात काम करणा-या अधिका-यांना जास्त असल्यामुळे त्याची अचूक तपासणी वरील संस्थेपेक्षा मंडळाचे अधिकारी करू शकतील. त्यासाठी 1992 मध्ये मंडळांने वेगवेगळे पथक नेमून एका सर्कलचा साठा दुस-या सर्कलने तपासून सादर करण्यात यावा असा आदेश काढण्यात आला. व मार्च ,93

पर्यंतच्या साठयाची अशा पध्दतीने तपासणी झालेली आहे व त्याचा अहवाल मध्यवर्ती मंडळाला प्राप्त झालेला आहे. त्याची तपासणी चालू असून आजचा साठा किती आहे, न वापरता घेण्याजोगा साठा किती आहे. त्याचा आढावा घेण्याची कार्यवाही चालू आहे. मा.राज्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण, यांनी असे सुचविले की,साठयावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांचे संगणीकरण करण्यात यावे व ही कार्यवाही क्रमाक्रमाने करण्यात यावी.प्रथम कांही कार्यालयांच्या साठयांचे संगणीकरण करण्यात यावे व तदनंतर तो इतरही कार्यालयांना लागू करण्यांत यावा. त्यांनी असेही सुचविले की,मंडळाच्या अधिका-यांकडून (नेमलेल्या) केलेली साठयाची तपासणी बरोबर आहे किंवा नाही त्याची खात्री करुन घेण्यासाठी चार्टर्ड अकौंटट नेमून चाचणी करुन घ्यावी.या साठी प्रथम कांही भांडारांची निवड करण्यात यावी. व या चाचणी नंतर जर असे आढळून आले की, मंडळाच्या पथकाने केलेली तपासणी बरोबर आहे. तर प्राप्त तपासणीसाठी सी.ए.च्या नेमणूकीची आवश्यकता रहाणार नाही. त्यांनतर खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव:**

"असा ठराव करण्यात येतो की,1991-92 लेखा परिक्षण अहवालास दिलेली उत्तरे व अभिप्राय याला मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. असाही ठराव करण्यात येतो की,1991-92 चे प्रमाणित वार्षिक लेखे त्यावरील लेखा परिक्षण अहवालासह दोन्ही विधी मंडळासमोर मांडण्यासाठी राज्य शासनाला सादर करण्यात यावेत"

**कार्यक्रम बाब क्र.7 :-** वार्षिक लेखे 1992-93

सदस्य सचिवांनी मंडळाचे 1992-93 वर्षाचे लेखे मंडळासमोर सादर केले. त्यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

"असा ठराव करण्यात येतो की (1) 1992-93 चे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात यावेत. (2) आणि असेही ठरविण्यांत येत आहे की, 1992-93 या वर्षाचे लेखे मंडळाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी अधिप्रमाणित करावेत .(3) तसेच असाही ठराव करण्यात येतो की,स्विकृत करण्यात आलेल्या लेख्यामध्ये ज्याच्या मुळे त्याच्या माहितीत फरक पडत नाही अशा किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती लेख्यामध्ये मंडळाचे सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या स्वाक्षरीने करता येईल. (4) खालील विनियोजन मान्य करण्यात यावेत असाही ठराव करण्यांत येत आहे.

(अ) रु.~~0.30~~ २३०.३० लाख एवढी रक्कम घसारा निधीकडे विनियोजित करण्यात यावी.

(ब) रु.154.18 लाख खर्च निवारण निधीकडे विनियोजित करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र.8 :-** मंडळ सदस्यांकडे फिरवून मंजूर करण्यात आलेल्या कार्यक्रम बाबींचे अनुसमर्थन.

ही बाब मांडतांना सदस्य सचिवांनी असे नमुद केकले की,1993-94 वित्तीय वर्षात आयुर्विमा महामंडळाने नागरी पाणी पुरवठा योजना व जलनि:सारण योजनांकरीता मंजूर केलेले कर्ज, त्यांचे अटी व शर्तीनुसार उभारणे. तसेच त्याकरिता मंडळाची सामान्य मुद्रा (कॉमन सिल) उठवून करारनामा सादर करण्या संदर्भात मंडळाचे पदसिध्द अधिकारी यांची नेमणूक करणे यासाठी मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता होती. मंडळाची 62 वी सभा केंव्हा होईल हे निश्चित नव्हते. मंडळास योजनांकरीता तातडीने निधीची आवश्यकता होती. त्यामुळे खालील कार्यक्रम बाबी मा.मंडळ सदस्यांमध्ये फिरवून बहुमतांनी मंजूर करण्यात आल्या. या सर्वांना आता अनुसमर्थन देणे आवश्यक आहे.

त्यानंतर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव:,

"असा ठराव करण्यात येतो की, मंडळ सदस्यांमध्ये फिरवून बहुमतांनी मंजूर करण्यात आलेल्या खालील कार्यक्रम बाबींचे अनुसमर्थन करण्यात येत आहे.

1) अ) नागपूर मलनि:सारण योजना टप्पा.2, भाग.1
ब) अकोला वाढीव पाणी पुरवठा योजना आणि
क) वसई-विरार पाणी पुरवठा योजना, टप्पा.1 यांच्या साठी आयुर्विमा महामंडळाचे कर्ज उभारणे. (परिशिष्ट "अ")

2) 1993-94 वित्तीय वर्षात नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांकरीता उभारावयाचे आयुर्विमा महामंडळाचे कर्ज (परिशिष्ट "ब")

**कार्यक्रम बाब क्र.9:-** मंडळ सदस्यांकडे कार्यक्रम बाब फिरवून मंजूर करण्यात आलेल्या कार्यक्रम बाबींचे अनुसमर्थन

सदस्य सचिव यांनी याबाबत थोडक्यात पार्श्वभूमी सांगितली व त्यानंतर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :,

"असा ठराव करण्यात येतो की, मंडळ सदस्यांकडे फिरवून बहुमतांनी मंजूर करण्यांत आलेल्या खालील कार्यक्रम बाबींचे अनुसमर्थन करण्यांत येते आहे.

सोलापूर पाणी पुरवठा योजना (उज्जनी धरण स्त्रोत्र धरुन) 1016 मि.मी.बाहय व्यासाचे 9.5 मी.मी.जाडीचे मृदू पोलादी पाईप्स (लांबी 47,000 मी.) तयार करणे, पुरविणे व ताब्यात देणे संबंधीच्या निविदा स्विकारणे बाबतची कार्यक्रम बाब"

**कार्यक्रम बाब क्र.10:-** ई.टी.पी.चार्जेस सुधारीत करणे बाबत.

सदस्य सचिव यांनी प्रस्ताव मंडळापुढे मांडून ई.टी.पी.चार्जेसमध्ये सुधारणा करणे का आवश्यक आहे याबददलची सविस्तर पार्श्वभूमी विषद केली. त्यानंतर मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, ई.टी.पी.चार्जेस वाढविण्यास फार टीका होण्याची शक्यता असल्याने या विषयाचा गंभीरपणे अभ्यास करावा व ई.टी.पी.चार्जेस सुधारण्यापूर्वी ई.टी.पी.चार्जेस मधून होणारा खर्च कोणत्या पध्दतीने व कोण कोणत्या कार्यबाबींवर कमी करता येणे शक्य आहे त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सध्या अस्तीत्वात असलेला दर हा लोकांना जास्त वाटतो. म्हणून ई.टी.पी.चा दर वाढविण्यापेक्षा खर्च कमी करण्याकडे आपला कल असावा. व ई.टी.पी.च्या दरामध्ये सुधारणा करणे आवश्यक असेल तर प्रथम बाबवार कायम (फिक्सड् ओव्हर हेडस) स्वरूपाचा खर्च व बाबीवार वरकड (व्हेरिएबल ओव्हरहेडस) खर्च किती होतो याचा विश्लेषणात्मक तक्ता दयावा व ई.टी.पी.चार्जेस सुधारणे अत्यंत गरजेचे आहे असे वाटल्यास त्याला पूर्ण समर्थन देऊन मगच ही बाब मंडळापुढे मांडण्यात यावी. म्हणून मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, सध्या ही कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र.11:-** नगरपालिकांकडून शासनातर्फे थकबाकी वसुल करणे बाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. तसेच सद्यस्थिती बाबत मंडळाने नोंद घेतली.

**कार्यक्रम बाब क्र. 12:**—नगरपालिकांसाठी आयुर्विमा महामंडळ व बँकाकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी शासनाला अहवाल.

या बाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव:,

" मंडळाची अत्यंत बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेता मंडळ शासनाला असे अवाहन करते की, वर उल्लेखिल्या प्रमाणे नगरपालिकांसाठी घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज यांच्या परतफेडीसाठी मंडळाकडे निधी नसल्याने मंडळावर बोजा पडू नये म्हणून शासनाने 31.3.1993 पूर्वीच आणि 1993-94 साठी रू.43.52 कोटी एवढे खास अनुदान मंडळाला द्यावे आणि पुढेही मंडळाची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत अशा सर्व कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी शासनाने स्विकारावी".

**कार्यक्रम बाब क्र. 13** :महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, पाणी पुरवठा शाखेत मुख्य अभियंता दर्जाचे (सहसचिव) पद निर्माण करून त्या पदावर महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातील अभियंतांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणे बाबत.

सदस्य सचिवांनी प्रस्ताव थोडक्यात विषद केला. सचिव ग्राम विकास यांनी ग्राम विकास विभागात सह सचिवाचे पद निर्माण केल्याने व त्यावर मंडळाच्या मुख्य अभियंताची नेमणूक केल्याने पाणी पुरवठा योजनांना गती देण्याचे कामी फार उपयोग झाला असे नमूद केले. सचिव नगर विकास यांनीही असे अतिरिक्त पद असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व यासाठी मंत्री मंडळासमोर जावे लागेल असे सांगितले.

नंतर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला

ठराव:,

"असा ठराव करण्यात येतो की, ग्राम विकास विभागाच्या धर्तीवर, मंत्रालयीन विभागाला त्वरित तांत्रिक सल्ला उपलब्ध होण्याचे दृष्टीने नगर विकास विभागातही सह सचिव दर्जाचे एक पद सहाय्यक पदांसह निर्माण करून त्यावर मंडळाच्या अभियंत्यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात यावी. सदर प्रस्ताव मंजूरी नंतर शासनाला सादर करण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत"

**कार्यक्रम बाब क्र. 14:**—जागतिक बँक अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा.1 मधील निविदातील डीम्ड एक्सपोर्ट बाबतचे ठेकेदारांना द्यावयाचे फायदे.

प्रस्ताव मांडतांना सदस्य सचिव यांनी असे स्पष्ट केले की, मा.अध्यक्ष यांनी 61 व्या सभेतील दिलेल्या सुचनेनुसार हा प्रस्ताव ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे सल्यासाठी पाठविण्यात आला होता. ॲडव्होकेट जनरल यांनी शासनाच्या विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायांना सहमती व्यक्त केली असल्यामुळे हा प्रस्ताव मंडळापुढे मांडण्यात येत आहे. या नंतर खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव:,

"विधी व न्याय विभाग त्याचप्रमाणे ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र शासन यांच्या मतानुसार जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्पांतर्गत टप्पा.1 मधील नळ पाणी पुरवठा योजनांच्या 8 आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदामधील शर्तीनुसार केंद्र शासनाच्या "डीम्ड एक्सपोर्ट सवलती" या योजनेखाली अबकारी कराचा परतावा मंडळास कंत्राटदारांकडून मागण्यांचा हक्क राहात नाही. त्यामुळे ती सवलत ठेकेदारांना राखून ठेवता येईल. या प्रस्तावास मंडळ मान्यता देत आहे व सदस्य

सदस्य सचिव यांना पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत."

**कार्यक्रम बाब क्र.15:–**मोरबे धरण योजनेवरील कर्मचा–यांना प्रकल्पभत्ता देय होण्यासाठी प्रकल्पक्षेत्र घोषित करणे बाबत.

या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव:,

1) शासन निर्णय ,पाटबंधारे विभाग,दि.17.3.77 मधील अटी मोरबे धरण प्रकल्प योजना पूर्ण करित असल्याने, ही योजना प्रकल्पक्षेत्र म्हणून घोषित करण्याचा सहाय्यक मुख्य अभियंता, कोकण प्रदेश मुंबई यांचे परिपत्रक दि.26.10.86 मधील विहित नमुन्यामध्ये, शासन नगर विकास विभागास मंडळाचे मध्यवर्ती कार्यालयाचे दि.8.1.92 च्या पत्रान्वये सदस्य सचिव,यांनी सादर केलेल्या प्रस्तावाशी हे मंडळ सहमत आहे.

2) मोरबे धरण योजना प्रकल्पक्षेत्र म्हणून घोषित केल्यानंतर शासन निर्णय दि.17.3.77 मध्ये नमुद केलेल्या अटी पूर्ण करणा–या कर्मचा–यांना विहित दराप्रमाणे प्रकल्प भत्ता मंजूर करण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यात यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.16:–**जागतिक बॅंक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प टप्पा.1 पॅकेज.1 मधील स्वीकृत निविदेतील ॲ.सी.पाईप व सी.आय.डी.जॉईन्टसचे एस्केलेशन संबंधी.

हि बाब पुढे ढकलण्यात आली.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.1:–** अहमदनगर जलनि:सारण योजना 10.5 द.ल.लि.प्रतिदिनी क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राची संकल्पना,बांधकाम करणे.मे.हॅड्रोलिक्स ॲंड जनरल इंजिनिअर्स कंपनीचे वाढीव एस्कलेशनचे मागणी बाबत.

हि बाब पुढे ढकलण्यात आली

**टेबल कार्यक्रम बाब क्र.2:–**बाणकोट प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता.मंडणगड,जि.रत्नागीरी. मे.पटेल कंन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदाराच्या धरणाच्या कामाच्या कंत्राटातील एस्कलेशन मागणी बाबत.

हि बाब पुढे ढकलण्यात आली.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.3:–**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सद्यस्थिती याबाबत मंडळाने नोंद घेतली.

या नंतर अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त झाली.